## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर-१५८/२०२३**

**अपिलार्थी, श्री.सुनिल दत्ताराम नरे,**
**इ/१०१, फ्लोरेन्स बिल्डींग, मोहक सिटी,**
**विरार नालासोपारा लिंक रोड, विरार पूर्व,**
**ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०५.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्र.श्रे),संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई यांचे कार्यालय, जॉनी क्रॉस लेन, तामतलाव, वसई (प),ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई यांचे कार्यालय, जॉनी क्रॉस लेन, तामतलाव, वसई (प), ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ५.६.२०२२ | ९.६.२०२२ | ६.९.२०२२ | ८.१२.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. १७.१.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही असमाधानकारक व चुकीची आहे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(Sub registrar housing Vasai.*

*"(१. Please give details of action taken on my attached letter. २.If action taken please give details. ३.If action not taken give the details with reason for not taken any action. ४. Please let me know society can take others.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर असमाधानकारक असल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.८.१२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलकार यांचे अपिल फेटाळण्यात येत आहे." असे आदेश पारित केले आहेत.

याप्रकरणी उभयपक्ष अनुपस्थित असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी पुनश्च सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.५.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

संगणक -10

